स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद भारती यांच्या विकासात्मक कार्याचे गुणात्मक अध्ययन

आंतरविद्याशाखेअंतर्गत समाजकार्य विषयातील पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी

सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

पाटील अंकुश विश्वनाथ

मार्गदर्शक

डॉ. अंबादास कर्डीले

सहाय्यक प्राध्यापक

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड

डिसेंबर, २०२२

स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद भारती यांच्या विकासात्मक कार्याचे गुणात्मक अध्ययन

प्रस्तावना :

इसवी सनाच्या १८ व्या शतकात ब्रिटिश समाजात प्रबोधन झाले. युरोपातील समाजाचे आधुनिकीकरणही झाले होते, परंतु भारतातील समाज मात्र सामाजिक आणि धार्मिक अंधश्रद्धेत गुरफटला गेला होता. समाजात अनेक प्रकारच्या अनिष्ट प्रथा व चालीरितींचे प्राबल्य निर्माण झाले होते. अस्पृश्य समाजाला पिढ्यानपिढ्या हिंदू परंपरेनुसार नशिबी आलेली गावकुसाबाहेरची वस्ती, जन्मानुसार देणगी मिळालेला मेलेल्या जनावरांची कातडी कमविण्याचा व्यवसाय आणि कायमची उच्चवर्णीयांची पिळवणूक यांमुळे हा समाज कायमस्वरूपी मागासच राहिला. सर्व स्त्रियांवर अनेक प्रकारची बंधने लादण्यात आली होती. सतीप्रथा, केशवपन, बालविवाह, अस्पृश्यता, इ. प्रचलित प्रथा परंपरांनी समाज दुभंगला गेला होता. अशावेळी युरोपात होऊन गेलेल्या 'प्रबोधन संस्कृती पर्वाचे' वारे नवशिक्षित भारतीय विद्वानांना तत्कालीन भारतात धर्म आणि समाज सुधारणा चळवळींच्या दिशेकडे प्रवाहित करत गेले. या चळवळींची मुहूर्तमेढ भारतात लावण्याचे कार्य बंगालमधील राजा राममोहन रॉय यांनी केले. म्हणूनच त्यांची भारतीय इतिहासाने 'भारतीय समाजसुधारणांचे जनक' म्हणून नोंद घेतली. (पाटील सुभद्रा शिवाजीराव;१९९४)

याच काळात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात महात्मा जोतिराव फुले यांनी समाज क्रांतीला सुरुवात केलेली होती. महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा, सत्यशोधक समाज, विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता, बालविवाह विरोध, केशवपन बंदी, कामगार चळवळीला प्रोत्साहन, इ. कार्यामुळे महाराष्ट्राच्या विचारविश्वाला समाजक्रांती अनुभवायला मिळाली. या क्रांतीची शिदोरी पुढे छ. शाहू महाराजांनी शिरावर घेतली. १९ व्या शतकात म. जोतिराव फुले यांनी समतेचे बी पेरून जे झाड लावले, त्याला खतपाणी घालून वाढविण्याचे कार्य राजर्षि छ. शाहू महाराजांनी केले. या झाडाला कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव जेधे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णासाहेब लठ्ठे, भास्करराव जाधव, इ. च्या कार्यकर्तुत्वाच्या रूपाने पुढील काळात धुमारे फुटले. (कित्ता)

शेकडो वर्ष जे ज्ञान, सत्ता, संपत्ती यांपासून वंचित राहिले, त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता, शिकता यावे आणि विकासाच्या वाटा खुल्या व्हाव्यात, असा ध्यास छ. शाहू महाराजांनी घेतला होता. राजकीय स्वराज्य मिळविण्याचा प्रश्न त्यांनी गौण मानला. सामाजिक व समतेची प्रस्थापना करण्याच्या प्रश्नाला त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला. राजर्षि शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्व विशद करताना म्हटले आहे,“ शिक्षणच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.” (पडोळे ज्ञानोबा विठ्ठलराव; २०१७)

“स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद” हा नारा बुलंद करत ‘काले’ ता. कराड येथून शिक्षण क्रांतीच्या वादळाला कर्मवीर अण्णांनी १९१९ मध्ये ‘रयत शिक्षण संस्थे’ च्या माध्यमातून एका शैक्षणिक रोपट्याचे बीजांकुरण केले. कालांतराने त्यांच्या संघर्षाने या छोट्याशा रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रुपांतर झाले. गावखेड्यात शिक्षणाचा प्रचार-प्रसार सुरु झाला. कोण गाव पाटलाच्या वाड्यात, गावाच्या देवळात, मिळेल त्या ठिकाणी आठ-दहा गावांपैकी बाजारहाट भरणाऱ्या मोठ्या गावांमधून शाळा भरू लागल्या. दाढी-मिशा आलेले, नांगर-मोटा हाकणारे, काही लग्न झालेले, शेती-घर प्रपंचाला लागलेले तरुण पुन्हा शाळेत जाऊ लागले. यामुळे समाज शिक्षणाला गती येऊन थोडी फार आर्थिक सुबत्ता घरां-घरांमधून नांदू लागली. कित्येक हाल-अपेष्टा सहन करत संपूर्ण महाराष्ट्रभर शैक्षणिक क्रांतीची बीजं रोवण्याचं कार्य कर्मवीरांनी शेवटच्या श्वासापर्यंत केले. (पाटील रा. तु.;१९८६)

कर्मवीर अण्णांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात क्रांतिसिंह नाना पाटील आणि स्वामी रामानंद भारती यांची वेळोवेळी समर्थ साथ लाभली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्रातील सातारा, बंगालमधील मिदनापूर आणि उत्तर प्रदेशातील बलिया येथे सामान्य जनतेने ब्रिटिशांविरुद्ध उभारलेल्या ‘प्रतिसरकार’ला अविभाज्य स्थान आहे. यामध्ये साताराच्या प्रतिसरकारचे नेतृत्व करण्याचे कार्य क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केले. ब्रिटिशांच्या काळात त्यांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला आणि स्वातंत्र्योत्तर काळात नवमहाराष्ट्राच्या सदृढ रचनेसाठी अविश्रांत परिश्रम घेतले. (कित्ता)

सामान्य कुटुंबात जन्म घेतलेल्या क्रांतिसिंहाना जन्मजात बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टी यांचे वरदान लाभले होते. प्रतिसरकारच्या चळवळीपूर्वी ग्रामीण भागात केलेल्या प्रबोधन कार्यामुळे जनमानसाचा अचूक अंदाज त्यांना येत असे. ग्रामीण भागात कार्य करताना त्यांनी अफाट लोकसंग्रह केला, समाजाचा विश्वास संपादन केला आणि अंगभूत समंजसपणाने लोकसंघटनातून समाजाला एक नवीन दिशा देण्याचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य केले. "महाराष्ट्राच्या इतिहासाने त्यांना घडविले आणि त्यांनी महाराष्ट्राचा इतिहास घडविला" हे त्यांचे प्रतिसरकार चळवळीतील सहकारी बाबूजी पाटणकर यांचे चिरंजीव डॉ. भारत पाटणकर यांचे वाक्य त्यांच्या यथार्थतेचे दर्शन घडविते. (पाटणकर भारत; २००२)

स्वामी रामानंद भारती यांचा जन्म रामोहळ्ळी, ता. कंगेरी, म्हैसूर राज्य येथे अत्यंत सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. सामान्य शेतकरी कुटुंबातील या व्यक्तीचे १९३१ साली महाराष्ट्रात आगमन झाले अन् या कर्मभूमीची त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत सेवा केली. त्यांनी स्वकर्तुत्वाच्या जोरावर समाजाला नवप्रेरणा देताना शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातही नवप्रतिभेचा प्रशस्त मार्ग दाखविण्याचे कार्य केले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात त्यांची सातारा व सांगली जिल्ह्यातील समाजकार्याची भूमिका या भागाच्या विकासासाठी प्रभावी, सकारात्मक व दिशादर्शक आहे. त्यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान लाख मोलाचे आहे. त्यांच्या या कार्याची माहिती जाणून घेण्यासाठी "स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद भारती

यांच्या विकासात्मक कार्याचे गुणात्मक अध्ययन" या विषयाची निवड संशोधनासाठी करण्यात आली आहे. (पाटील रा. तु.;१९८६)

स्वामी रामानंद भारती यांची माहिती :

स्वातंत्र्यपूर्व काळातील साताऱ्यातील 'प्रतिसरकारची' दैदिप्यमान चळवळ आणि त्या चळवळीचा एक दिशादर्शक बौद्धिक हिरा म्हणजे स्वामी रामानंद भारती. जहाल व मवाळ असा कोणताही प्रवाद न मानता कॉंग्रेस व महात्मा गांधींच्या विचारांना प्रमाण मानणारे स्वामीजी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील एक उध्र्वयू व्यक्तिमत्व होते. स्वामीजींचे जीवितकार्य कोणा एका प्रदेश, समाज, जात, धर्म, भाषा या मर्यादेत बंदिस्त नव्हते. संपूर्ण भारत भ्रमण करून 'वसुधैव कुटुंबकम' या उक्तीला प्रमाण मानून साताऱ्याच्या पावन भूमीत ते शेवटपर्यंत कार्यरत राहिले. शिक्षणातही मूठभर लोकांची मक्तेदारी असलेल्या काळात ते ही ज्ञानगंगा घरोघरी पोहोचविण्यासाठी रयत, स्वामी, इ. शिक्षण संस्थांच्या जडणघडणीसाठी प्रयत्नशील राहिले. क्रांतिसिंह नाना पाटील व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबरोबर केलेले शैक्षणिक व सामाजिक कार्य त्यांची समाजोद्धाराची तगमग दर्शविते. (कित्ता)

प्रतिसरकारची चळवळ, शिवजयंती उत्सव, सातारा जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संस्थापक अध्यक्ष, ग्रामसुधारणा चळवळ, साखर कारखाने निर्मिती, दशनाम गोस्वामी समाज, स्वातंत्र्य सैनिकांसाठीच्या

सवलती, इ. स्वरूपाचे कार्य त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविते. या महाराष्ट्रातील जनतेसाठी स्वामीजी एखाद्या अविचल नंदादीपासारखे अखंड तेवत राहिले. स्वामीजींच्या विचारशक्तीला विशिष्ट तत्वांची बैठक आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. अंधश्रद्धाना विरोध, मुक्या प्राण्यांवरील प्रेम, समाजाप्रती अपार करूणा, सेवाभाव, समाजशिक्षणाची तळमळ, ग्रामसुधारणेची प्रयोगशीलता, उद्योगविकासाची गतिशीलता त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या या बाबी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. (कित्ता)

संदर्भ साहित्याचा आढावा :

अंबाडे किसन मारुती (१९९८) यांनी “महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा चिकित्सक इतिहास” या विषयावर १९९८ मध्ये पीएच.डी. पदवीसाठी पुणे विद्यापीठात प्रबंध सादर केला. त्यामध्ये त्यांनी महात्मा फुले यांचे जीवनकार्य, सत्यशोधक समाज निर्मितीपूर्वीचा महाराष्ट्र, या चळवळीचे सामाजिक व धार्मिक कार्यक्रम, तसेच आर्थिक व राजकीय कार्य यासह या चळवळीची केंद्रे आणि नेते या सर्व बाबींचा उहापोह केला आहे. उच्च-नीच भेद विसरून अखिल भारतीय पातळीवरील मानवतावादाचा पुरस्कार करणारी पहिली चळवळ आणि या चळवळीमुळेच पुढे कोल्हापूर संस्थानात छ. शाहू महाराजांनी राखीव जागांची निर्मिती करण्यास वाव मिळाला. या स्वरूपाचे परिणामकारक निष्कर्ष काढले आहेत.

पडोळे ज्ञानोबा विठ्ठलराव (२०१७) यांनी “राजर्षि शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास” या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून सप्टेंबर, २०१७ मध्ये पीएच.डी. पदवीसाठी प्रबंध सादर केला. या प्रबंधात त्यांनी शाहू महाराजांचे अस्पृश्यता निर्मूलनासाठीचे कार्य, शैक्षणिक व सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोण, तसेच त्यांच्या सामाजिक कार्याचे समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून आकलन या गोष्टींचा अंतर्भाव केला आहे. छ. शाहू महाराजांचे कार्य सामाजिक क्रांति व परिवर्तनाची नांदी होती. सक्तीचा व मोफत शिक्षण कायदा, वसतिगृह व सत्यशोधक चळवळ, इ. कार्याने ‘बामणाघरी लिहणं, कुणब्याघरी दाणं अन् महारा-मांगाघरी गाणं’ या परंपरेला छेद देऊन क्रांतिकारक दिशात्मक बदलांना कवेत घेताना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक-सामाजिक व्यवस्थेला परिवर्तनात्मक दिलेली गतिशीलता अनेक पिढ्यांना मार्गदर्शनपर असल्याचा निष्कर्ष सदरच्या प्रबंधात काढण्यात आला आहे.

यादव सुमित संभाजी (२०१२) यांनी “आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत क्रांतिसिंह नाना पाटील यांची भूमिका” या विषयावर २०१२ साली पीएच.डी. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठात प्रबंध सादर केला आहे. सदरच्या प्रबंधात त्यांनी क्रांतिसिंहांचे पूर्वायुष्य, सत्यशोधक चळवळ, सातारा प्रतिसरकार, शेतकरी कामगार पक्ष व संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान या बाबींची माहिती दिलेली आहे. सातारा प्रतिसरकारची निर्मिती हे महाराष्ट्राच्या इतिहासातील दैदिप्यमान पर्व असून क्रांतिसिंहांनी नेहमीच बहुजन समाजाच्या बाजूने घेतलेली भूमिका त्यांच्या सामाजिक तळमळीच्या भावात्मक निष्कर्षाला खतपाणी घालते.

मांडगे सुदाम तुकाराम (२०११) यांनी “रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पत्रांमधून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक कार्यावरील प्रभावांचा अभ्यास” या विषयावर २०११ मध्ये पुणे विद्यापीठास प्रबंध सादर केला. यामध्ये त्यांनी डॉ. भाऊराव पाटील यांचे जीवन व कार्य, पत्र वाङ्मय, त्यांनी अंगीकारलेली जीवनमूल्ये, विविध स्तरातील शिक्षण विषयक कार्य, राष्ट्रीय नेत्यांच्या नावे सुरु केलेल्या शाळा आणि महाविद्यालये, स्त्री शिक्षण, सर्व जाती-धर्मातील मुलांसाठी एकत्र वसतिगृहे, इ. स्वरूपाचे आश्वासक कार्य त्यांची शिक्षणाप्रती असणारी निष्ठा दर्शविते. मोफत शिक्षण, शिक्षणात समाजाचा सहभाग, स्वावलंबी शिक्षण व अस्पृश्य विद्यार्थ्यांना सवलती या महत्वपूर्ण निष्कर्षांचे प्रतिपादन या प्रबंधात करण्यात आले आहे.

समाजकार्य संशोधन पद्धती:

स्वामी रामानंद भारती यांच्या वैयक्तिक जीवनावर गांधीवादी विचारसरणीचा असलेला प्रभाव स्थानिक आणि ग्रामीण स्वयंपूर्णतेला अभिप्रेत करतो. स्वामीजींच्या समाजकार्याची पद्धती आणि कौशल्यांच्या अंतर्निहित संकल्पना, तत्वे, सिद्धांत यांच्या अभ्यासाचा अंगीकार संशोधनात केला जाणार आहे. ग्रामस्वराज्याची गांधीवादी दृष्टी ग्रामीण भागाच्या स्वयंपूर्णतेला एकमेकांवरील परावलंबित्व कमी करते. यामध्ये ग्रामसुधारणा चळवळीचे योगदान व महात्मा गांधीजींच्या सत्याग्रहापासून ग्रामविकासाच्या समाजकार्याची उकल

करण्यास प्रतिबद्ध होते. समाजकार्य संशोधन, वर्तन पैलू आणि सुधारणांच्या प्रतिकृतीवर लक्ष केंद्रीत करते.

संशोधनाचे महत्व :

आजच्या आधुनिक युगात आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, इ. विकासाला फार महत्व आहे. या विकासासाठी कित्येक महापुरुषांनी स्वतःच्या आयुष्यात अनेक गोष्टींचा त्याग करून समाजाच्या विचारविश्वाला, जडणघडणीला प्रमाण मानून कार्य केल्याने या प्रवाहाला प्रभावी गतिशीलता आणण्यात त्या सर्वांचे लाखमोलाचे योगदान आहे. स्वामी रामानंद भारती यांनी महाराष्ट्र भूमीत केलेले सांस्कृतिक शैक्षणिक व सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा झरा आजही विविध संस्थांच्या माध्यमातून अखंडपणे वाहत आहे. त्यांच्या या कार्याचा इतिहास संशोधनापासून आजपर्यंत वंचित राहिला आहे. हा संशोधनात्मक अभ्यास पूर्णत्वास आला तर भावी पिढीला नवप्रतिभेचा मार्ग दाखविणारा प्रेरणात्मक दीपस्तंभ बनून मार्गदर्शक ठरू शकेल. स्वामी रामानंद भारती यांचे उपेक्षित जीवनकार्यामुळे महाराष्ट्र स्तरावर झालेला बदलांच्या कार्यकारणभावाचा समाजकार्यात्मक अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाचा विषय :

प्रस्तुत संशोधनासाठी “स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद भारती यांच्या विकासात्मक कार्याचे गुणात्मक अध्ययन” या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. स्वामी रामानंद भारती यांची स्वभाव वैशिष्ट्ये, व्यक्तिमत्व, कार्यपद्धती आणि विचारसरणी यांचे अध्ययन करणे.

२. स्वामी रामानंद भारती यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय चळवळीचा समाजाला परिचय करून देणे.

३. स्वामी रामानंद भारती यांना विकासात्मक कार्य करित असताना आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

४. स्वामी रामानंद भारती यांनी सातारा आणि सांगली जिल्ह्यांच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.

५. स्वामी रामानंद भारती यांच्यामुळे झालेल्या बदलांचे समाजकार्यात्मक अध्ययन करणे.

संशोधन आराखडा :

संशोधन पद्धती शास्त्राच्या माध्यमातून शास्त्रीय संशोधनाचा मूळ गाभा सापडतो. संशोधन पद्धतीच्या द्वारे संशोधन कार्य यशस्वी वा उददेश प्राप्त होण्यासाठी फार मोठी मदत मिळते. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वापरण्यात आलेली संशोधन पद्धती, तिचे अर्थ व स्वरूप, महत्व आणि उपयोग तंत्र या सर्व बाबींची उकल इथे करण्यात येत आहे. “स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद भारती यांच्या विकासात्मक कार्याचे गुणात्मक अध्ययन” या विषयाच्या अध्ययनामध्ये स्वामी रामानंद भारती यांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय कार्याचा फार मोठा प्रभाव सातारा आणि सांगली जिल्ह्यावर आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सामाजिक बदलांसाठीचा स्वामी रामानंद भारती यांच्या कार्याचा मागोवा घेत असताना त्यांच्या कार्यानुरूप त्या-त्या समाजघटकाला आणि क्षेत्राला न्याय देताना समाजजीवनात झालेले बदल, मिळालेल्या प्रगतीच्या वाटा, कार्य करताना आलेल्या समस्या, आदी बाबींवर योग्य ठरणाऱ्या संशोधन पद्धतींचा वापर करण्यात येणार आहे. त्याकरिता प्रस्तुत संशोधन कार्यासाठी ऐतिहासिक संशोधन आराखडा वापरण्यात येणार आहे.

तथ्य संकलन पद्धत :

“स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद भारती यांच्या विकासात्मक कार्याचे गुणात्मक अध्ययन’’ या विषयाचे समाजकार्यात्मक दृष्टीकोनातून संशोधन करण्याकरिता खालीलप्रमाणे तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधन हे पूर्णतः द्वितीय तथ्यांवर आधारित असेल. त्याकरिता वर्तमानपत्रातील लेख, जीवनचरित्र, अभ्यासू मान्यवर लेखकांची प्रकाशित पुस्तके, कार्यक्रमपत्रिका, सुधारक विवाह पत्रिका, नियतकालिके, इ. द्वारे माहितीचे संकलन करण्यात येणार आहे. संबंधित संशोधनासाठी महाराष्ट्र राज्य विधिमंडळ ग्रंथालय, धर्मादाय कार्यालय, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था, विश्वास आणि तासगाव सहकारी साखर कारखाना, इ. ठिकाणांहून द्वितीय साधनांच्या मार्फत माहिती मिळविली जाणार आहे. मूळ हस्तलिखित, रोजनिशी, खाजगी पत्रव्यवहार, अस्सल प्रकाशित साधने आणि अध्यक्षीय भाषणे, इ. मार्गांचा उपयोग करून स्वामी रामानंद भारती यांच्या संदर्भातील तथ्य संकलित करण्यात येतील.

तथ्य विश्लेषण :

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राप्त तथ्ये गुणात्मक पद्धती तसेच व्यष्टी अध्ययन पद्धतीद्वारे विश्लेषित करण्यात येतील.

संशोधनाची व्याप्ती :

सदरच्या संशोधनामध्ये स्वामी रामानंद भारती यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचे अध्ययन करण्यात येणार आहे. या संशोधन कार्यात स्वामी रामानंद भारती यांची समाजकार्याची तळमळ प्रगट

करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात पश्चिम महाराष्ट्र म्हणजेच पुणे हा एक प्रशासकीय विभाग आहे. या प्रगत विभागाअंतर्गत सातारा आणि सांगली हे जिल्हे स्वामी रामानंद भारती यांच्या समाजकार्याच्या दृष्टीकोनातून संशोधकाने संशोधन क्षेत्र म्हणून निवडले आहेत. स्वामी रामानंद भारती यांच्या संपूर्ण आयुष्यातील समाजकार्य प्रामुख्याने या भागात झालेले आहे. त्यामुळे या दोन जिल्ह्यांच्या बाबतीत स्वामी रामानंद भारती यांच्या कार्याचा पडलेला प्रभाव, त्याद्वारे झालेली लोकजागृती, विविध समाजघटकांमध्ये झालेले दैनंदिन जीवनातील बदल या अनुषंगाने हा विषय अभ्यासण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन स्वामी रामानंद भारती यांच्या कार्याने प्रगतशील झालेल्या २ जिल्ह्यांपुरते मर्यादीत आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

संशोधकाला संशोधनकार्य करताना संशोधन विषयाला वस्तुनिष्ठ, शस्त्रशुद्ध व निपक्ष स्वरूप येण्यासाठी संशोधन मर्यादा निश्चिती महत्वाची आहे. “स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद भारती यांच्या विकासात्मक कार्याचे गुणात्मक अध्ययन” हा विषय स्वामी रामानंद भारती यांच्या जीवनपटाला (१८९७-१९७३) अग्रस्थान देऊन त्या मर्यादेत संशोधित केला जाणार आहे. शिवाय त्यांचे समाजकार्य प्रामुख्याने सातारा आणि सांगली जिल्ह्यात असल्याने त्यांचा प्रभावक्षेत्राचा क्षेत्रीय अनुबंध या दोन जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे. स्वामीजींचा मृत्यू होऊन ५० वर्षे पूर्ण झाल्याने त्यांच्या सर्व समकालीन सहकाऱ्यांद्वारे माहिती मिळणे दुरापस्त बाब आहे. परिणामी संशोधन कार्याच्या संदर्भात मुलभूत माहिती

संकलनात समस्या निर्माण होण्याची मर्यादा प्रस्तुत संशोधन कार्यातील प्रमुख अडचण आहे.

प्रकरण नियोजन :

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख पैलू विचारात घेता संशोधन एकूण सहा प्रकरणात विभागण्यात येणार आहे. संशोधन आराखड्याच्या आकलनासाठी त्यातील आशयाचे प्रकरण निहाय थोडक्यात विवेचन खालील प्रमाणे मांडण्यात आले आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - समाजकार्य संशोधन पद्धती

प्रकरण तिसरे - स्वामी रामानंद भारती यांचे वैयक्तिक जीवन व स्वभाव वैशिष्ट्ये

प्रकरण चौथे - स्वामी रामानंद भारती यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य

प्रकरण पाचवे - स्वामी रामानंद भारती यांचे सांस्कृतिक व राजकीय कार्य

प्रकरण सहावे - निष्कर्ष, शिफारशी व समाजकार्य प्रारूप.

संदर्भ सूची :

स्वामी रामानंद भारती यांची रोजनिशी.

माळी धोंडीराम (१९७१), स्वामी रामानंद भारती यांच्यावरील हस्तलिखित.

पाटील रा. तु. (१९८६), परखड प्रकाशन, स्वातंत्र्यसेनानी श्री स्वामी रामानंद भारती प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १९, २०, २१, २४, २५, २६, २८, २९, ३०, ३१, ४१, ४२, ४३, ४६, ४७, ४८, ७९

पाटणकर भारत (२००२), महाराष्ट्राचे शिल्पकार नाना पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. ६

आगलावे डॉ. प्रदीप (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. १६९, १७१, १७२, १७९,१८८.

पडोळे ज्ञानोबा विठ्ठलराव, (२०१७), राजर्षि शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास, पीएच. डी. शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, पृष्ठ क्र. १०१.

माने राजा (२०११), महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.२५, ३८, ४१, ४३, ४४, ४५, ४७, ४९, ५२, ५६, ५७, ५९, ८४.

कोळी भाई गणपतराव (2008), पुरोगामी जीवनसफर, प्रकाशक- मधुकर रावकर, संपादक ‘युगारंभ’, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. २०

तळवलकर गोविंद (२०१२), यशवंतराव चव्हाण: व्यक्तित्व व कर्तृत्व, मौज प्रकाशन, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. ४६

सनदे सा. बा. ‘राही’ (१९८३), ‘जीवनसंग्राम (क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र. २३

पाटील सुभद्रा शिवाजीराव, (१९९४), विद्यालंकार शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, प्रकाशक- जयप्रकाश पाटील, प्रथमावृत्ती, पृष्ठ. क्र. ७०,८६,१७६,१८३,१९५,१९६,१९७.

साळुंखे डॉ. शरद (संपादक), ‘पत्रात भेटणारे बापूजी’, प्रकाशक- अभयकुमार साळुंखे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.५१, ६३, ६४, १०७, १०८.

गणपतराव नलवडे, शिराळा व सोनूताई पवार, बोरगाव यांचा सुधारक विवाह, (१९३७) लग्नपत्रिका दि. २२ मे, १९३७

श्री शिवजयंती उत्सव दुधोंडी, (१९३८), संस्थान सांगली, कार्यक्रमपत्रिका, दि. १९ मार्च, १९३८.

पिरापुढे बकऱ्याचे बळी देण्याची रूढी बंद, दै. लोकशक्ती, दि. ११ मे, १९३८.

प्राणीहत्या बंद करा, (१९३९), दै. ज्योति, दि. २१ फेब्रुवारी, १९३९.

संगम माहुली (सातारा) येथील ‘चयनयाग’ यज्ञातील होमात चार मुक्या पशूंची क्रूर आहुती, (१९३९), मूलचंद भाईचंद पारेख, ऑ. सेक्रेटरी, जैन श्वेतांबर प्रा. परिषद यांनी काढलेली विनंतीपत्रिका, दि. २५ मार्च, १९३९.

मातंग परिषद हातनूर, (१९३९), कार्यक्रमपत्रिका, दि. १६ नोव्हेंबर, १९३९.

स्वामी श्रीरामानंदजी महाराज म्हैसूरकर, (१९४०), प्रगति आणि जिनविजय, दि. ३ जानेवारी, १९४०.

चांभार बंधूस जाहीर विनंती पत्रक, (१९४०), श्रीक्षेत्र औदुंबर येथील भंडारा, दि. २७ फेब्रुवारी, १९४०.

श्री शिवजयंती उत्सव, (१९४०), दुधोंडी सं. सांगली कार्यक्रमपत्रिका, दि. ९ मार्च, १९४०.

रावसाहेब तात्या रावजी यांचे स्वामीजींना पत्र, दि. २९ मे, १९४०.

‘शिराळा पेट्यातील जनतेला’ विनंतीपत्रक, दि. २४ ऑगस्ट, १९४०.

देशभक्त आनंदराव नाईक यांचा मांगले येथे सत्याग्रह, (१९४१), कार्यक्रमपत्रिका, दि. २६ मार्च, १९४१.

श्रीरामानंद स्वामी यांचा सत्याग्रह, (१९४१), दै. लोकशक्ती, दि. २८ मार्च, १९४१.

रामानंद महाराजांचा इशारा, जातिनिष्ठ संस्थापासून जागरूक रहा!, (१९४८), दै. जनक्रांती, दि. ७ फेब्रुवारी, १९४८

अधिक धान्य पिकवा अंक, (१९४९), साप्ताहिक ऐक्य–सातारा, दि. १९ जून, १९४९

फलटण येथे २००० पोती लेव्ही दिनाचा समारंभ, (१९४९), दै. प्रकाश, दि. १४, मार्च, १९४९.

वाळवे, जिल्हा सातारा येथे श्री शिवछत्रपतींच्या अर्ध पुतळ्याचा अनावरण समारंभ, (१९४९), दै. लोकनेता, १२ मे, १९४९.

वाळवे येथील 'हुतात्मा किसन ऐर' विद्यामंदिराचा कोनशीला समारंभ , स्वामी रामानंद भारतींचे उद्बोधक विचार, (१९४९), दै. प्रकाश, २७ ऑक्टोंबर, १९४९.

खानापूर विद्यार्थी बोर्डींगास रामानंद भारती व वसंतदादा पाटील यांची भेट, (१९४९), दै. ज्योति, दि. ४ नोव्हेंबर, १९४९.

सातारा जिल्हा रामोशी शिक्षण परिषदेचे तिसरे अधिवेशन, पू. रामानंद भारती यांचे हस्ते उद्घाटन, (१९४९), दै. ज्योति, दि. २८ डिसेंबर, १९४९.

के. हनुमंतय्या, मुख्यमंत्री, म्हैसूर राज्य यांचे स्वामीजींना पत्र, दि. २२ नोव्हेंबर, १९५२.

गणपतराव दे. तपासे, पुनर्वसन, मत्स्य, मागास प्रवर्ग व हौसिंग मंत्री, मुंबई सरकार यांचे पत्र, १९ ऑगस्ट, १९५५.

पू. स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्थेतर्फे चालविलेले "प.पू. स्वामी रामानंद भारती वि. वसतिगृह पे. शिराळे" प्रथम अहवाल, दि. १ ऑगस्ट, १९५६.

आ. वसंतदादा पाटील, चेअरमन, शेतकरी सह. साखर कारखाना, सांगली यांचे मसुचीवाडी ग्रामस्थांना उद्देशून पत्र, दि. १९ मे, १९६१.

धोंडीराम माळी, चिटणीस, स्वातंत्र्यसंग्राम सैनिक समिती, सांगली यांचे स्वामीजींना पत्र, दि. ३ मार्च, १९६५.

स्वातंत्र्यसैनिकांना मदत, स्वामी रामानंद यांचे प्रयत्न,(१९६६), दै. सकाळ, दि. ५ मार्च, १९६६.

तुरुंगवास भोगलेले व पुरावा उपलब्ध नसलेले व्यक्तींची यादी, दि. २३ मार्च, १९६७

तुरुंगवास भोगलेल्या तासगांव व खानापूर तालुका ११० स्वातंत्र्यसैनिकांच्या यादीचे पत्र, सचिव, सांगली जिल्हा स्वातंत्र्यसैनिक समिती यांचे पत्र, दि. २६ जुलै, १९६७.

श्री. वसंतदादा पाटील यांचे शिवभवानी सह. साखर कारखाना संदर्भात पत्र, दि.२१ ऑगस्ट, १९६७.

तासगांव तालुका साखर कारखाना उभारणीसाठी भव्य मेळावा निमंत्रण पत्रिका, दि. ७ मे, १९६९.

श्री. रा. ना. मराठे सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांचे स्वामीजींना पत्र, दि. २२ नोव्हेंबर, १९७२.

महावीर पांडुरंग साळुंखे हायस्कूल नामकरण सोहळा, (१९७२), कार्यक्रमपत्रिका, दि. १४ डिसेंबर १९७२.

स्वामी रामानंद भारती क्रांतिकारक संन्यासी, (१९९३), साप्ताहिक आपले जग, दि. १ मे, १९९३.

संशोधक **मार्गदर्शक**

पाटील अंकुश विश्वनाथ **डॉ. अंबादास कर्डीले**

सहाय्यक प्राध्यापक

जवाहरलाल नेहरू समाजकार्य

महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड